# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## प्रकाश विभाग

## दर सूचना (कोटेशन नोटीस)

अमनपा/प्रवि/शअ/1019/2025

दिनांक:- 28/11/2025

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाइट खांबांवर टाकलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्सचे सर्वेक्षण करण्यासाठी अधिकृत एजन्सी नेमण्यासाठी दरपत्रक (कोटेशन) मोहोरबंद लिफाफ्यामध्ये अथवा ई- मेलद्वारे मागविण्यात येत आहे.

**विषय :- अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाइट खांबांवर टाकलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्सचे सर्वेक्षण करण्यासाठी अधिकृत एजन्सी नेमण्याबाबत.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक Sankirna-2021/C.R.242/UD-20, दिनांक १९ डिसेंबर २०२२

"Maharashtra Telecom Infrastructure Guidelines for Urban Local Bodies, 2022".

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात विविध केबल ऑपरेटरांकडून परवानगीशिवाय स्ट्रीट लाइट खांबांवर ऑप्टिकल फायबर केबल्स टाकण्यात आल्या आहेत. वरील शासन निर्णयाच्या कलम ७ नुसार महानगरपालिकेला आपल्या क्षेत्रातील सर्व अस्तित्वात असलेल्या "Overground Telecom Infrastructure" म्हणजेच स्ट्रीट लाइट खांबांवर बसविलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्सचे सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने, खालील अटी व शर्तीवर महानगरपालिकेच्या वतीने एक पात्र एजन्सी/संस्था नेमण्यात येणार आहे.

१) सर्वेक्षणाचे उद्दिष्ट :

१. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व स्ट्रीट लाइट खांबांवरील ऑप्टिकल फायबर केबल्स, क्लॅम्प्स, जॉइंट्स, व संबंधित उपकरणांची अचूक नोंद करणे.

२. कोणत्या ऑपरेटरने परवानगीशिवाय केबल्स टाकल्या आहेत हे ओळखणे.

३. प्रत्येक केबल मार्गाचे स्थान (Route Map), GPS कोऑर्डिनेट्ससह डिजिटल नकाशावर नोंदविणे.

४. नियमबाह्य किंवा धोकादायक जोडणींची माहिती देणे.

२) कार्यक्षेत्र :

अमरावती महानगरपालिका हद्दीतील सर्व रस्ते व स्ट्रीट लाइट खांब.

एकूण सर्वेक्षण क्षेत्र अंदाजे १२१.६५ चौ.कि.मी. (महानगरपालिकेच्या सीमा प्रमाणे).

३) आवश्यक पात्रता :

- शासन मान्यताप्राप्त संस्था असावी.
- शासकीय/अर्धशासकीय संस्थांसाठी किमान ३ सर्वेक्षण प्रकल्पांचा अनुभव असावा.
- GIS Mapping व डिजिटल डेटा संकलनाची सुविधा असणे आवश्यक.

४) अपेक्षित अहवाल :

- प्रत्येक रस्त्यावरील केबल्सची यादी (खांब क्रमांकासहित).

- ऑपरेटरचे नाव (असल्यास).

- अनधिकृत केबल्सची वेगळी यादी.

- सर्व माहिती GIS आधारित सॉफ्ट कॉपीमध्ये (Excel / Shapefile / KML Format).

५) कालावधी :

संपूर्ण सर्वेक्षण कार्य ३० दिवसांत पूर्ण करण्यात यावे.

६) मानधन व पेमेंट :

प्राप्त निविदा दरपत्रकानुसार ठरविण्यात येईल.

७) अटी व शर्ती :

- सर्वेक्षणादरम्यान सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी एजन्सीची राहील.
- सर्व माहिती गोपनीय ठेवावी व ती केवळ अमरावती महानगरपालिकेस वापरासाठी दिली जाईल.
- "Maharashtra Telecom Infrastructure Guidelines for Urban Local Bodies, 2022" मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असेल.

८) अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख :

इच्छुक संस्था/एजन्सींनी आपला प्रस्ताव (Technical व Financial) सीलबंद लिफाफ्यात खालीलप्रमाणे सादर करावा.

| | |
|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि.२८ /११/२०२५ ते दि.०५ /१२/२०२५ दु. ०४.०० वाजेपर्यंत |
| दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | शहर अभियंता, महानगरपालिका अमरावती |
| ई-मेल आयडी | ee1pwdamc@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०७२१-२५७६४८२ |

टिपः-

१) दर वस्तु व सेवा कर वगळून (Exclusive of G.S.T) देण्यात यावे.

२) दरपत्रक सादर करण्याकरीता मान्यताप्राप्त उत्पादक किंवा वितरक असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३) दरपत्रक सादर करण्याचा कालावधी नंतर प्राप्त झालेले दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

शहर अभियंता

अमरावती, महानगरपालिका अमरावती